॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
ज्ञान ही अशी संपत्ती आहे,
जी वाटल्याने नेहमी वाढते.

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ११ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### शिक्षकद्वेषी

गुणवत्तेला ठेवताय तुम्ही
फक्त मुख्यालयाशी जोडून
पळ काढताय महोदय
अशैक्षणिक कामे सोडून
व्यवस्थेत नको सुधारणा
करा शिक्षकांनाच सरळ
घरभाडे देता म्हणून का
काही ओकायची गरळ

वीरभूमी

# मध्यमवर्गीयांसाठी एनडीए रात्रं-दिवस काम करणार

## मोदींची तपपूर्ती, जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणार

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ सेवा देण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. याबाबत त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मोडला. या निमित्त नवी दिल्ली येथे आयोजित मेळाव्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘जनता जनार्दन माझ्यासाठी ईश्वराचे रूप आहे. एनडीए सरकारचे लक्ष नेहमी गरीब कल्याण, विकास आणि सुशासन यावर केंद्रित राहिले आहे. मध्यमवर्गीयांनाही मागे पडू द्यायचे नाही. त्यासाठी आपल्याला रात्रंदिवस काम करावे लागेल. जनतेने आमच्याकडून ज्या अपेक्षा ठेवल्या आहेत, त्या आम्ही नक्की पूर्ण करू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

या ऐतिहासिक टप्प्यानिमित्त नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे एनडीएच्या नेत्यांचा, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा आज विशेष मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी पंतप्रधानांनी उपस्थितांना संबोधित केले. २०१४ मध्ये जनतेने एनडीएवर विश्वास दाखवला आणि आमच्या आघाडीने त्या विश्वासाला अधिक बळकट करण्याचे काम केले. मला समाधान आणि अभिमान वाटतो की, एनडीएने एक कुटुंब म्हणून देशाचा विश्वास नेहमीच दृढ केला.

पुढे बोलताना पंतप्रधान म्हणाले की,



‘एनडीए सरकारच्या गेल्या १२ वर्षांच्या कार्यकाळात २५ कोटींहून अधिक लोक गरिबीतून बाहेर आले आहेत. हे सरकारच्या धोरणांची दिशा आणि उद्दिष्टे योग्य असल्याचा ठोस पुरावा आहे. एनडीए सरकारचे लक्ष नेहमीच गरीब कल्याण, विकास आणि सुशासन यावर केंद्रित राहिले आहे. याच कारणामुळे जनतेचा सरकारवरील विश्वास सातत्याने वाढत गेला आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एनडीए सरकार यापुढेही त्याच निर्धाराने आणि समर्पणाने काम करत राहील. पूर्वीची व्यवस्था आणि आताच्या व्यवस्थेत फरक असून, पूर्वीची व्यवस्था लोकांना प्रतीक्षा करायला लावत होती तर आजची व्यवस्था प्रत्यक्ष परिणाम देत आहे. हा त्या भारताचा प्रवास आहे, ज्याने पहिल्यांदाच आपल्या संपूर्ण क्षमतेने धावण्यास सुरुवात केली आहे.

### विकसित भारत राष्ट्रीय संकल्प

■ गेल्या १२ वर्षांत देशाने विकास, सुशासन आणि जलद निर्णयक्षमतेचा नवा अध्याय अनुभवला आहे. विकसित भारताचा संकल्प हा केवळ सरकारचा कार्यक्रम नाही. तो आज १४० कोटी भारतीयांचा राष्ट्रीय संकल्प बनला आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी सरकार आणि जनता एकत्रितपणे पुढे जात आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात सर्वाधिक काळ सलग सेवा देणारे मनिर्वाचितफ पंतप्रधान बनण्याचा ऐतिहासिक टप्पा गाठल्याबद्दल केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी एकमुखाने अभिनंदन प्रस्ताव मंजूर केला. भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील हा एक ऐतिहासिक मैलाचा दगड असल्याचे मंत्रिमंडळाने म्हटले आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल मंत्रिमंडळाच्या सर्व सदस्यांनी उभे राहून पंतप्रधान मोदींना टाळ्यांच्या कडकडाटात मानवंदना दिली.

मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला. जवाहरलाल नेहरू यांचा निर्वाचित पंतप्रधान म्हणून ४,३९८ दिवसांचा विक्रम मोदी यांनी मोडीत काढल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. मोदींच्या नेतृत्वाखाली भारत एक स्वावलंबी, सुरक्षित आणि समृद्ध राष्ट्र म्हणून नवी शिखरे सर करत राहील, असा विश्वास या ठरावात व्यक्त करण्यात आला आहे.

पंतप्रधानांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळाचे श्रेय एनडीएच्या सर्व मित्रपक्षांना दिले. ते म्हणाले, सर्वात जास्त काळ सलग सेवा देणारा निवडून आलेला पंतप्रधान म्हणून मिळालेला कार्यकाळ, हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे एकत्रित यश आहे.

देशातील जनतेवर पूर्ण विश्वास व्यक्त करत पंतप्रधान म्हणाले की, भारताच्या १४० कोटी जनतेने जी स्वप्ने पाहिली आहेत, त्या सर्व आकांक्षा नक्कीच पूर्ण केल्या जातील. आमच्यासाठी नेहमीच मपार्टीपेक्षा देश मोठाफ राहिला असून, देशाचे हित हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. तसेच, आमच्या सरकारसाठी मसुधारणाफ ही कोणतीही सक्ती किंवा मजबुरी नसून, ती आमची दृढ निष्ठा आणि वचनबद्धता आहे.

## SPOT NEWS

### यंदाचा मान्सून अनिश्चितच!

**● पुणे –** प्रशांत महासागरात उदयास येत असलेल्या अल निनो प्रणालीमुळे मान्सूनच्या पावसात लक्षणीय घट होण्याची शक्यता लक्षात वर्तवण्यात आली असून यंदाचा मान्सून अनिश्चित असल्याची माहिती हवामान खात्याकरवी जारी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तयारी सुरू केली आहे. सर्वाधिक प्रभावित होण्याची शक्यता असलेले १९७ जिल्हे चिन्हांकित करण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. अल निनोच्या परिणामांना तोंड देण्यासाठी आपत्कालीन योजना तयार करत असल्याचेही ते म्हणाले. परिस्थितीवर लक्ष ठेवले जात असून हा आकडा वाढू शकतो. पावसाचे स्वरूप बदलू शकते, त्यामुळे बियाण्यांची व्यवस्था केली जात असून, गरज असेल तिथे इतर पिके घेण्याविषयी शेतक-यांना सूचित केले जात आहे, असेही त्यांनी सांगितले. तसेच विकासित भारत जी राम जी योजनेसंदर्भात चौहान म्हणाले की, १ जुलैपासून मनरेगाच्या जागी राबविण्यात येणा-या नवीन योजनेसाठी १.२५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

### राममंदिरात चोरी; पंतप्रधानांनी अहवाल मागवला

**● अयोध्या –** अयोध्या राम मंदिरात आलेल्या देणगीतून ७ कोटी रुपयांची चोरी झाल्याच्या दाव्यावर पंतप्रधान कार्यालयाने मंदिर ट्रस्टकडून अहवाल मागवला आहे. भाजप नेते डॉ. रजनीश सिंह यांनी मंगळवारी पंतप्रधानांना पत्र लिहून सीबीआय चौकशीची मागणी केली होती. दरम्यान, भवन निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्र यांनी मंगळवारी ट्रस्टच्या सदस्यांसोबत बैठक घेतली होती.

## राहुरीसह अन्य कृषी विद्यापीठांतील पद भरती; ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
राज्यातील कृषी विद्यापीठांच्या सुधारित आकृतीबंधाला मंजुरी मिळाली आहे. तब्बल २३ वर्षांनंतर विद्यापीठांच्या अ आणि ब संवर्गातील एकूण ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे विद्यापीठांमधील रिक्त पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या गट - अ व गट - ब संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतीबंधास राज्य शासनाने मंजुरी दिली. या संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. नियमित ३,६११ पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येणारी ११२ पदे, अशा एकूण ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी., डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे १,२१७, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे ५८९, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे ८९० आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे ९१५ नियमित पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे.

काही पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. गट क आणि गट ड संवर्गातील पदांबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरू आहे. शेतकर्यांच्या गरजा, शेती पुढील नवी आव्हाने विचारात घेऊन आकृतीबंध अंतिम करण्यात आला आहे. कृषी विद्यापीठांच्या कार्यक्षमतेत वाढ, संशोधनाला चालना आणि विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

## नगर उपविभागीय अधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यकासह कंत्राटी कर्मचार्याला लाच घेताना रंगेहाथ पकडलं

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीच्या नुकसानभरपाईची रक्कम मंजूर करून देण्यासाठी एक लाख गितल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक आणि एका कंत्राटी कर्मचार्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

यामध्ये महसूल सहाय्यक मंगेश विजय ढुमणे (सध्या नेमणूक जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर) आणि कंत्राटी कर्मचारी अमोल कानिफनाथ खामकर (उपविभागीय अधिकारी कार्यालय, श्रीगोंदा-पारनेर विभाग) यांचा समावेश आहे.

तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीची मौजे जंगलेवाडी (ता. श्रीगोंदा) येथील १४३ गुंठे जमीन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डीवरील रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पासाठी शासनाने संपादित केली होती. या भूसंपादनाच्या बदल्यात तक्रारदारांना अतिम व पुरवणी अवॉर्डनुसार सुमारे १ कोटी ४७ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर झाली होती. मात्र, या रकमेतील प्रलंबित निधी मिळण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. (फंड ट्रान्स्फर ऑर्डर) मंजूर करून देण्याच्या प्रक्रियेत संशयित आरोपींनी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संशयितांनी वेळोवेळी पैशांची मागणी केली होती. तसेच ४ मे २०२६ रोजी महसूल सहाय्यक मंगेश ढुमणे याने व्हॉट्सॲप कॉलव्दारे तक्रारदारांशी संपर्क साधून एक लाख २० हजार रुपयांची मागणी केली. पैसे दिल्यास एफ. टी.ओ. तात्काळ मिळेल आणि मंजुरीसाठी वरिष्ठ अधिकार्यांनाही पैसे द्यावे लागतील, असे संशयिताने सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या तक्रारीची गंभीर दखल घेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ६ मे रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली. या पडताळणीत मंगेश ढुमणे आणि अमोल खामकर यांनी तक्रारदारांची नुकसानभरपाईची रक्कम मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेली एफ.टी.ओ. मंजुरी मिळवून देण्याच्या मोबदल्यात १ लाख २० हजार रुपयांची लाच मागितल्याचे आणि ती स्वीकारण्यास सहमती दर्शविल्याचे स्पष्ट झाल्याची माहिती एसीबीने दिली.

# बहरीन, कुवैत आणि जॉर्डनमधील अमेरिकन तळांवर इराणचे भीषण क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले

## अमेरिका-इराण युद्ध भडकले । हॉर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये तेलवाहू जहाजांना बनवले लक्ष्य

**● तेहरान –**
पश्चिम आशियामध्ये युद्ध पेटले असून अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष आता अत्यंत विनाशकारी वळणावर पोहोचला आहे. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ अमेरिकेचे अपाचे हेलिकॉप्टर कोसळल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार अमेरिकेने इराणच्या अनेक शहरांवर भीषण बॉंबवर्षाव केला. अमेरिकेच्या या ताज्या लष्करी कारवाईमुळे संतप्त झालेल्या इराणने बहरीन, कुवैत आणि जॉर्डन या तीन देशांमध्ये पसरलेल्या अमेरिकन लष्करी तळांवर आणि तेलवाहू जहाजांवर क्षेपणास्त्रे डागत प्रचंड विध्वंस घडवून आणला आहे. इराणच्या या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण आखाती क्षेत्रात युद्धाचा भडका उडाला आहे.

जागतिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने या महाभयंकर हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. अमेरिकेने ८ एप्रिल रोजी झालेल्या युद्धबंदीच्या कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप इराणने केला आहे. इराणने बहरीनमध्ये तैनात असलेल्या अमेरिकेच्या फिफ्थ फ्लीट नौदल तळाला आणि शेख ईसा एअरबेसवर ड्रोन आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी लक्ष्य केले असून तेथील रडार यंत्रणा उद्ध्वस्त केल्याचा दावा केला आहे. तसेच कुवैतमधील अमेरिकन हवाई दलाचे मुख्य केंद्र असलेल्या अली अल सलेम आणि अहमद अल-जाबेर एअरबेसवर इराणने आत्मघातकी ड्रोन डागले, ज्यामुळे कुवैतला आपली हवाई हद्द तात्काळ बंद करावी लागली. जॉर्डनमधील अमेरिकेच्या अल-अझराक लष्करी तळावरही इराणने लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे डागली असून जॉर्डनच्या लष्कराने यातील काही क्षेपणास्त्रे हवेतच पाडल्याचे सांगितले आहे.

अमेरिकेला आर्थिक कोंडीत पकडण्यासाठी इराणच्या लष्करी कमांडने जागतिक व्यापाराचा मुख्य मार्ग असलेली हॉर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्याची घोषणा केली आहे. या जलमार्गातून बेकायदेशीररीत्या जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन मोठ्या व्यापारी तेलवाहू जहाजांवर इराणच्या नौदलाने क्षेपणास्त्र आणि तोफांनी थेट हल्ला केला. या इशाऱ्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल दोन डॉलरपेक्षा जास्त वधारले असून कच्च्या तेलाची किंमत पंच्याण्णव डॉलरच्या पार पोहोचली आहे.

इराणच्या या हल्ल्यापूर्वी, अमेरिकेने इराणच्या अंतर्गत भागात मोठी हवाई कारवाई केली होती. अमेरिकन लढाऊ विमानांनी इराणचे दक्षिण बंदर असलेल्या बंदर अब्बास, केशम बेट, जास्क आणि सिरिक शहरांवर जोरदार बॉम्बफेक केली. या हल्ल्यात इराणचे हवाई संरक्षण तळ आणि रडार केंद्रांसह सामान्य नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचे दोन मोठे साठे आणि टेलिकम्युनिकेशन टॉवर्स उद्ध्वस्त झाले आहेत. इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांनी अमेरिकेच्या या कृतीचा तीव्र निषेध केला असून, सामान्य लोकांचे पाणी आणि वाहतूक व्यवस्था बंद करणे हा शौर्याचा भाग नसून, अमेरिकेची हतबलता आहे, अशी टीका केली आहे.

अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सांगितले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या थेट निर्देशानुसारच इराणच्या लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यात आले. डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारीच इराणवर शांतता चर्चेत मुद्दाम उशीर करत असल्याचा आरोप केला होता आणि आम्ही त्यांना चोख उत्तर देऊ अशी धमकी दिली होती, ज्यानंतर लगेचच हे हल्ले सुरू झाले. पेंटागॉनने दावा केला आहे की इराणने डागलेली बहुतांश क्षेपणास्त्रे आणि ड्रोन अमेरिकेच्या अत्याधुनिक एअर डिफेन्स सिस्टीमने हवेतच नष्ट केले असून अमेरिकेचे कोणतेही मोठे नुकसान झालेले नाही. मात्र, दोन्ही देशांमधील हा थेट संघर्ष पाहता, पश्चिम आशियामध्ये आता पूर्ण क्षमतेचे जागतिक युद्ध सुरू होण्याची भीती निर्माण झाली आहे.

SPOT NEWS

## ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण, नोंदणी व ओळखपत्र वितरण अभियानास सुरुवात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण, नोंदणी व ओळखपत्र वितरण अभियान राबविण्यात येत असून, जिल्ह्यात ग्रामपंचायती, पंचायत समित्या तसेच संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून सर्वेक्षण व नोंदणीचे काम सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व ऊसतोड कामगारांनी आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालय, संबंधित पंचायत समिती अथवा सर्वेक्षण पथकाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे. दि. २१ सप्टेंबर २०२१ व दि. ३१ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयांतील तरतुदींनुसार लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी स्मार्ट सर्विसेस प्रा. लि., पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. नोंदणीसाठी आधार कार्ड, बँक पासबुक, स्वयंघोषणापत्र, ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र तसेच रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. नोंदणी केल्यानंतर ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार असून त्यांना अधिकृत ओळखपत्र उपलब्ध होणार आहे. तसेच भविष्यातील विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविणे अधिक सोपे होणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा समन्वयक महेश आढाव यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## दुर्मिळ हस्तलिखिते, अभिलेख व दस्तऐवजांची 'ज्ञानभारतम' ॲपवर नोंदणी १५ जूनपुर्वी करा

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक विश्वस्त संस्था, मंदिरे, मठ, आश्रम, धार्मिक व शैक्षणिक संस्था तसेच प्रतिष्ठानांनी जतन केलेल्या दुर्मिळ हस्तलिखिते, पोथ्या, धार्मिक ग्रंथ, अभिलेख तसेच आयुर्वेद, गणित, विज्ञान, खगोलशास्त्र, इतिहास, समाजसुधारणा, गड-किल्ले, लोकपरंपरा आदी विषयांवरील दुर्मिळ हस्तलिखिते व दस्तऐवजांची माहिती केंद्र शासनाच्या 'ज्ञानभारतम' ॲपवर दि. १५ जूनपर्यंत नोंदवावी, असे आवाहन धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर यांनी केले आहे. धर्मादाय संस्थांकडे अनेक वर्षांपासून जतन करण्यात आलेली ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाची हस्तलिखिते उपलब्ध आहेत. या अमूल्य ज्ञानसंपदेचे जतन, संवर्धन व डिजिटल दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने 'ज्ञानभारतम' उपक्रम सुरू केला आहे. या ॲपवर नोंदणी करताना हस्तलिखिताचे शीर्षक, भाषा, लिपी, विषय, जतनाची स्थिती, मालकी हक्कासंबंधी माहिती तसेच संबंधित हस्तलिखितातील काही पानांची छायाचित्रे अपलोड करता येतील.

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वामुळे

# शिर्डी मतदारसंघ राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी


**अभय शेळके । मराठा आरक्षण, औद्योगिक वसाहत आणि गोदा-नर्मदा जलयात्रेमुळे विकासाला गती मिळाल्याचा दावा**

● **शिर्डी । वीरभूमी –**

राज्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक घडामोडींमध्ये प्रभावी नेतृत्व करत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिर्डी विधानसभा मतदारसंघाला राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आणल्याचा दावा शिर्डीचे उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी केला.

पत्रकारांशी संवाद साधताना शेळके म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्यासोबत राधाकृष्ण विखे पाटील यांनी अनेकवेळा सकारात्मक चर्चा करत तोडगा काढण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सुविधा व सवलती लागू करण्याचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक आणि क्रांतिकारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राहुरी विधानसभा आणि विधानपरिषद निवडणुकांमध्ये अनेक राजकीय घडामोडी घडत असताना विखे पाटील यांनी प्रभावी समन्वय साधत मार्ग काढला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेला विश्वास त्यांनी सार्थ ठरवला. त्यामुळे राहुरी मतदारसंघात भाजपचे दोन आमदार निवडून आले. विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार प्राजक्त तनपुरे आणि आमदार अक्षय कर्डिले यांनीही सार्वजनिकरित्या विखे पाटील यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याचा दावा शेळके यांनी केला.



शिर्डी औद्योगिक वसाहतीसाठी शेती महामंडळाची सुमारे ५०० एकर जमीन हस्तांतरित करून विकासाचा नवा अध्याय सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी देशातील खासगी क्षेत्रातील पहिला तोफगोळे निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाल्यामुळे शिर्डी मतदारसंघ राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आल्याचे ते म्हणाले.

याच औद्योगिक वसाहतीमध्ये टाटा उद्योगसमूहाने कौशल्य विकास प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण व रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. आगामी काळात या औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून सुमारे दहा हजार युवकांना रोजगार उपलब्ध होईल, असा विश्वासही शेळके यांनी व्यक्त केला.

> जलसंपदा विभागाला लोकाभिमुख करण्याचे काम मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. गोदावरी कालवे व वितरिकांच्या नूतनीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच गोदा ते नर्मदा जलयात्रा यशस्वी करत पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे आणण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला त्यांनी गती दिली आहे.
>
> 
>
> **– अभय शेळके,**
> उपनगराध्यक्ष, शिर्डी

## नेप्तीत सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर तालुक्यातील नेप्ती गावाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून गावाचा विस्तारही मोठ्या प्रमाणावर होत आहे. गावामध्ये शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणे तसेच विविध सामाजिक उपक्रम सातत्याने वाढत आहेत. मात्र या वाढत्या वर्दळीच्या पार्श्वभूमीवर गावाच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे गावातील प्रमुख चौक, रस्ते, शाळांच्या परिसरात तसेच सार्वजनिक ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसवावेत, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल चौगुले व रामदास फुले यांनी ग्रामसेवक प्रवीण पानसंबळ यांच्याकडे केली.

यावेळी माजी उपसरपंच जालिंदर शिंदे, ज्ञानेश्वर जपकर, सोसायटी सदस्य सुरेश कदम, विष्णू गुंजाळ, रामदास कोल्हापूरे, बापू साळवे, हनुमंत साळवे, सोमनाथ ठुबे, शिवम पवार व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी ग्रामसेवकाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यास गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. गावामध्ये अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी दररोज ये-जा करत असतात. अशा परिस्थितीत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य होईल.

## निंबळक येथे महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती तसेच जागतिक मासिक पाळी स्वच्छता सप्ताहानिमित्त निंबळक येथे विशेष महिला आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात पार पडले. महिलांचे आरोग्य चांगले तर कुटुंबाचे आरोग्य चांगले या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास महिला व किशोरी मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशन आणि सोशल कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे तसेच सरपंच सौ. प्रियंका अजय लामखडे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुलभा पवार यांनी मासिक पाळी स्वच्छता, महिलांचे आरोग्य, रक्तक्षय (निमिया), स्त्रीरोगविषयक समस्या तसेच महिलांमध्ये आढळणाऱ्या विविध आरोग्यविषयक आजारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच हिमोग्लोबिन तपासणी करून आवश्यक आरोग्य सल्ला देण्यात आला.

यावेळी आरोग्यविषयक समस्या असलेल्या महिलांना मोफत ओपीडी सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी गर्भवती मातांची मोफत तपासणी, सर्व रुग्णांची मोफत शुगर तपासणी आणि मोफत ईसीजी तपासणी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कार्यक्रमास कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, सचिव प्रियंका शेळके (बोबडे), सामाजिक कार्यकर्ते हर्षल आगळे, डॉ. अमित पवार, डॉ. सुमित आबेकर, डॉ. सतीश गेरंगे, ग्रामसेवक रासकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, किशोरी मुली तसेच स्वयंसेवकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# राशीन येथील जगदंबा देवी मंदिर ओवरीवरील दुसरा शिलालेख

**दिल्लीचे सेनापती पानिपतवीर सरदार अंताजी माणकेश्वर गंधे यांचे ऐतिहासिक योगदान**

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राशीन येथील प्रसिद्ध श्री जगदंबा देवी मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या ओवऱ्यांतील एका खांबावर हा महत्त्वपूर्ण शिलालेख कोरलेला आहे. सदर शिलालेख देवनागरी लिपीतील मराठी भाषेत असून तो सात ओळींचा आहे. अनेक वर्षे उघड्यावर राहिल्यामुळे तसेच सततच्या रंगरंगोटीमुळे त्यावरील अक्षरे काही प्रमाणात अस्पष्ट झाली आहेत. मात्र शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर वाचण्यात यश आले.

शिलालेखाचे वाचन

*१. श्री भवानी प्रसन्न*
*२. स्वस्ति श्रीनृप शाळीवाहन श*
*३. के १६७९ ईश्वर नाम संवछरे मा*
*४. घ वद्य प्रतिपदा ते दिवसी श्री य*
*५. माई चरणि तत्पर अंताजी माण*
*६. केस्वर गंधे कुळकर्णी मौजे काम*
*७. रगाव वोवऱ्या श्री भवानी श्री सार्थ*

या शिलालेखाचे वाचन अनिल दुधाणे व अनिकेत रजपूत यांनी केले आहे.

शिलालेखाचा अर्थ असा आहे की.

श्री भवानीच्या कृपेने, शालिवाहन शक १६७९, ईश्वर नाम संवत्सर, माघ वद्य प्रतिपदा म्हणजेच दि. २४ फेब्रुवारी १७५८, शुक्रवार या दिवशी श्री जगदंबा देवी अर्थात यमाई देवीच्या चरणी समर्पित भावनेतून मौजे कामरगावचे कुळकर्णी अंताजी माणकेश्वर गंधे यांनी मंदिरातील ओवऱ्या बांधून त्या श्री भवानीस अर्पण केल्या.

हा शिलालेख मराठाकालीन मंदिर स्थापत्य, शक्ती उपासना आणि स्थानिक समाजाच्या धार्मिक योगदानाचा महत्त्वपूर्ण पुरावा मानला जातो. श्री यमाई चरणी तत्पर या उल्लेखातून अंताजी माणकेश्वर गंधे यांची देवीभक्ती स्पष्ट दिसून येते. त्यामुळे हे कार्य केवळ वास्तू बांधणी नसून धार्मिक श्रद्धेतून केलेले पुण्यकर्म असल्याचे दिसते.

मंदिरातील ओवरी हा त्या काळातील अत्यंत उपयुक्त भाग मानला जात असे. येथे यात्रेकरू, भक्त, पुराणश्रवण करणारे लोक तसेच धार्मिक विधींमध्ये सहभागी होणाऱ्या ग्रामस्थांना आश्रय मिळत असे. त्यामुळे या बांधकामातून मंदिराच्या सामाजिक व धार्मिक कार्यक्षेत्राचा विस्तार झाल्याचे स्पष्ट होते.

याशिवाय शिलालेखातील शके १६७९, ईश्वर नाम संवत्सर, माघ वद्य प्रतिपदा ही कालनोंद मराठाकालीन इतिहासाच्या कालमापनासाठी महत्त्वपूर्ण ठरते. तसेच कुळकर्णी या पदनामाच्या उल्लेखामुळे तत्कालीन ग्रामप्रशासनाची माहितीही मिळते.

या शिलालेखातून पानिपतवीर सरदार अंताजी माणकेश्वर गंधे यांचे योगदान अधोरेखित होत आहे.

अंताजी माणकेश्वर गंधे हे मराठ्यांच्या दिल्ली मोहिमेतील महत्त्वाचे सेनाधिकारी होते. दि. १४ जानेवारी १७६१ रोजी झालेल्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धात त्यांनी पराक्रम गाजवला. या भीषण युद्धात मल्हारराव, विठ्ठल शिवदेव, तानाजी गायकवाड, सटवोजी जाधव, साबाजी शिंदे, गंगोबा तात्या चंद्रचूड यांच्यासह अंताजी माणकेश्वर हेही गंभीर जखमी झाले होते.

इतिहासकारांच्या उल्लेखानुसार, युद्धानंतर बाजी हरी आणि नाना पुरंदरे यांच्यासोबत प्रवास करत असताना दांडग्यांच्या हल्ल्यात फारुकाबादच्या जमीनदाराकडून बाजी हरी व अंताजी माणकेश्वर यांची हत्या करण्यात आली. तलवार आणि लेखणी या दोन्ही क्षेत्रांत प्राविण्य मिळवलेल्या या पराक्रमी पुरुषाच्या निधनामुळे मराठा इतिहासाची मोठी हानी झाली.

राशीन येथील श्री अंबिका-जगदंबा मंदिरात अंताजी माणकेश्वर गंधे यांनी दीपमाळ उभारल्याचा उल्लेखही आढळतो. मंदिरातील सर्व ओवऱ्या गंधे यांनी बांधल्याचे सांगितले जाते. राजे भोसले, अंताजी माणकेश्वर गंधे आणि शेटे सरकार या तिघांच्या सहकार्याने राशीनचे



मंदिर उभारण्यात आले असल्याची स्थानिक परंपरा आहे.

दीपमाळेवरील शिलालेखात अंताजी माणकेश्वर गाव कामगार कामरगावकर असा उल्लेख आढळतो. यावरून त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि स्थापत्य क्षेत्रातील योगदानाची साक्ष मिळते.

राशीन येथील हा शिलालेख मराठाकालीन धार्मिक जीवन, ग्रामव्यवस्था, दानपरंपरा आणि मंदिर स्थापत्य यांचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तऐवज आहे. पानिपतवीर सरदार अंताजी माणकेश्वर गंधे यांच्यासारख्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचे स्थानिक धार्मिक कार्याशी असलेले नाते या शिलालेखामुळे प्रकाशात येते. त्यामुळे हा शिलालेख केवळ दगडावरील लेख नसून मराठा इतिहास, श्रद्धा आणि समाजजीवनाचा जिवंत पुरावा ठरतो.



या शिलालेखाचे वाचन अनिल किसन दुधाणे व अनिकेत रजपूत यांनी केले आहे तर त्यांना अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी, सेवेकरी, जगदंबा देवी ट्रस्ट राशीन तसेच शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचलित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ, सचिन भोसले यांनी सहकार्य केले आहे.

# SPOT NEWS

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन अहिल्यानगर येथील राष्ट्रवादी भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त पक्ष कार्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, ख्रिश्चन सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे, अशोक बाबर, विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, फारूक रंगरेज, सतीश क्षेत्रे, मतीन शेख, शरद शिंदे, समीर पठाण, गणेश तोडमल, परवेज शेख, विजय सात्रलकर आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर म्हणाले की, पक्ष स्थापनेपासूनची वाटचाल ही अभिमानास्पद राहिली असून समाजातील सर्व स्तरांतील शेवटच्या घटकापर्यंत पक्षाने आपले नाते दृढ केले आहे. आगामी काळातही हे नाते अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्यरत राहणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणाले की, विकासाची दृष्टी समोर ठेवून राज्य व देशाला प्रागतीपथावर नेण्याचे ऐतिहासिक कार्य पक्षाचे संस्थापक आदरणीय खासदार शरद पवार यांनी केले आहे. सामान्य माणसांचे प्रश्न जाणून घेत उपेक्षित घटकांपर्यंत आर्थिक व सामाजिक परिवर्तन पोहोचविण्याचे ध्येय हेच पक्षाच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. पक्षाच्या २७ व्या वर्षात पदार्पणाच्या निमित्ताने पुरोगामी विचारांचा वारसा अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षाचे ध्येय-धोरण जनतेपर्यंत पोहोचवून पक्ष मजबुतीकरणासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करत पक्षाविषयीच्या भावना व्यक्त केल्या तसेच आगामी काळात संघटन अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## प्रा. डॉ. दीपक जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

बी दि चेंज फाउंडेशनच्या वतीने अहिल्यानगर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे रेसिडेन्शिअल कला,वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दिपक नाना जाधव यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले. शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील गुणवंत, कर्तव्यनिष्ठ व समाजाभिमुख शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याबद्दल गौरव करण्यात आला. यामध्ये प्रा. डॉ. जाधव यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी सुभेदार मेजर दिनकर पवार, माजी सैनिक अधिकारी अरुण भंडारे, अभिनेत्री निवेदिता पगार, बाबासाहेब कांपे, प्रकाश कोळपे तसेच अमृत रोहोम आदी उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे, सचिव रचना ढोकचौळे व विश्वस्त अभिषेक तुपे यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.

# पारनेरमध्ये विनाचिठ्ठी आणि अनधिकृत गोळ्यांची कथित विक्री

## गुडघेदुखी व संधिवातावर रामबाण उपायाचा दावा; अन्न व औषध प्रशासन व पोलिसांनी चौकशी करण्याची मागणी

● **पारनेर । वीरभूमी-**

राज्यात अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांकडून अवैध औषध विक्री, बनावट औषध निर्मिती तसेच भ्रामक जाहिरातींविरोधात कठोर कारवाईची मोहीम सुरू असताना, पारनेर शहरात कथितरित्या विनापरवाना आणि विनाचिठ्ठी औषध विक्रीचा गंभीर प्रकार समोर आला आहे. नव्या पेठेतील एका स्थानिक व्यावसायिकाकडून गेल्या अनेक वर्षांपासून तालुक्यातील वृद्ध, गोरगरीब आणि गरजू नागरिकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत त्यांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप केला जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यावसायिकाकडून डॉक्टरांची कोणतीही अधिकृत चिठ्ठी नसताना रुग्णांना थेट औषधे दिली जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या गोळ्यांवर कोणत्याही अधिकृत औषध कंपनीचे नाव, उत्पादन दिनांक, एक्स्पायरी डेट किंवा घटकद्रव्यांची माहिती नमूद नसल्याचे सांगितले जात आहे. सध्या प्लास्टिकच्या पिशवीत पांढऱ्या रंगाच्या गोळ्या भरून, त्या गुडघेदुखी, संधिवात आणि अंगदुखीवर रामबाण उपाय असल्याचे सांगत विक्री केल्याचा आरोप आहे.

पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक वृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक माहितीअभावी अथवा आर्थिक अडचणींमुळे या व्यावसायिकाकडे उपचारासाठी जात असल्याचे समोर येत आहे. तात्पुरता आराम मिळत असल्याच्या समजुतीत अनेक रुग्ण वर्षानुवर्षे या अज्ञात गोळ्यांचे सेवन करत असल्याची चर्चा आहे.

या गोळ्यांमध्ये आरोग्यास अपायकारक ठरू शकणारे स्टेरॉईड्स किंवा उच्च क्षमतेची वेदनाशामक रसायने असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा पदार्थांच्या दीर्घकालीन सेवनामुळे मूत्रपिंड, यकृत यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर विपरीत परिणाम होण्याबरोबरच इतर गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

राज्यभरात बनावट औषध विक्रीविरोधात कारवाई सुरू असताना पारनेरमधील हा कथित प्रकार प्रशासनाच्या नजरेतून कसा सुटला, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील सुज्ञ नागरिकांनी या प्रकरणाबाबत चिंता व्यक्त केली असून, याची सखोल चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे.

विनापरवाना आणि अज्ञात औषधांची विक्री हा कायद्याने गंभीर गुन्हा मानला जातो. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन तसेच पारनेर पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित दुकानाची तपासणी करावी, संशयित गोळ्या जप्त करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवाव्यात आणि दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

निष्पाप नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्यापूर्वी या कथित रॅकेटचा पर्दाफाश करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## नंदुरबार येथे एसटी सेवानिवृत्तांचे राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दोन दिवसीय राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन १२ व १३ जून रोजी नंदुरबार येथे आयोजित करण्यात आले आहे. संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे यांच्या नेतृत्वाखाली आणि कार्याध्यक्ष श्रीराम गालेवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या अधिवेशनात राज्यभरातील हजारो सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी होणार असून, पेन्शन, ईपीएस-९५, संघटनेची भावी वाटचाल आणि आंदोलनात्मक भूमिका यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

राज्याची 'दक्षिण काशी' म्हणून ओळख असलेल्या नंदुरबार येथील गजानन महाराज मंदिर, कोकणी हिल बसस्टॉपजवळ या ठिकाणी हे अधिवेशन पार पडणार आहे. या अधिवेशनात अहिल्यानगर जिल्ह्यातील एसटी सेवानिवृत्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बलभीम कुबडे, गोरख बेळगे, गंगाधर कोतकर, अर्जुन बकरे आणि विठ्ठल देवकर यांनी केले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात गेल्या वर्षभरात झालेल्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठका, उच्चाधिकार समितीच्या सभा, पेन्शन समितीच्या बैठका तसेच विविध प्रादेशिक चिंतन मेळाव्यांमधील निर्णयांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. संघटनेच्या कार्याचा लेखाजोखा मांडण्याबरोबरच आगामी काळातील धोरणात्मक दिशा निश्चित करण्यावरही भर दिला जाणार आहे. याशिवाय सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठीच्या केंद्रीय कार्यकारिणीला मंजुरी देणे, पेन्शन विषयातील अभ्यासू व अनुभवी सेवानिवृत्तांची समित्यांवर निवड करणे आणि संघटनेच्या विविध उपक्रमांबाबत निर्णय घेणे यावर चर्चा होणार आहे.

## भाऊसाहेब फिरोदिया ज्युनिअर कॉलेजच्या गुणवंतांचा गौरव

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या बारावी (एचएससी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या निकालात अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने उल्लेखनीय यश संपादन करत शास्त्र शाखेचा १०० टक्के तर वाणिज्य शाखेचा ९८.११ टक्के निकाल नोंदविला आहे. या उत्कृष्ट निकालामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

निकालात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संस्थेच्या वतीने उत्साहात पार पडला. संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त अ‍ॅड. गौरव मिरीकर, मुख्याध्यापक कैलास साबळे, उपमुख्याध्यापक व्ही. डी. कुलकर्णी, पर्यवेक्षक रेणुका परदेशी, नंदू जाधव, निलीमा शिंदे, शिक्षकवृंद, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शास्त्र शाखेत रचेत रविकांत काबरा याने ८२.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. नक्षत्रा विजय शिंदे हिने ७९.३३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर गौरव विजय भुकन याने ७७.२२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. काजल सुशील शिंगवी हिने ७३.६७ टक्के गुणांसह चौथा क्रमांक मिळवला असून शताक्षी जयंत कुलकर्णी हिने ७३.५० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक प्राप्त केला.

वाणिज्य शाखेत तनिष्का भरत मुथा हिने ८८.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांकावर नाव कोरले. अंकिता दिनानाथ ठाकूर हिने ८४.६७ टक्के गुणांसह द्वितीय, आदेश मनोज लुणिया याने ८३.६७ टक्के गुणांसह तृतीय, त्रिशा अजय गंगावाल हिने ८०.५० टक्के गुणांसह चौथा, तर हिमांशु कुशल विजन याने ७९.१७ टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया तसेच सहकार्यवाह गौरव फिरोदिया यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे हे फळ असून, भविष्यातही त्यांनी उच्च शिक्षणात आणि विविध क्षेत्रांत यश संपादन करून भावी आयुष्यात यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव

## एसटी को-ऑप बँकेच्या वतीने ६० निवृत्तांचा सपत्निक सत्कार

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या दीर्घ, प्रामाणिक आणि समर्पित सेवेला मानवंदना देण्यासाठी एस.टी. को-ऑप बँक लि.च्या अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एसटी महामंडळातील विविध आगारातून निवृत्त झालेल्या सुमारे ६० कर्मचाऱ्यांचा सपत्निक सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती, कामगार अधिकारी बाळासाहेब एकशिंगे तसेच एसटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक व प्राथमिक शिक्षक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत जगताप उपस्थित होते.

एसटी को-ऑप बँकेचे संचालक बालाजी शिंदे आणि प्रवीण जाधव यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारप्रसंगी मान्यवरांनी निवृत्त कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम केला. याशिवाय एसटी बँकेचे शाखा व्यवस्थापक, कर्मचारी, एसटी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना आणि एसटी मधील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त करून सेवानिवृत्तांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संचालक बालाजी शिंदे म्हणाले की, एसटी महामंडळ ही केवळ वाहतूक व्यवस्था नसून लाखो प्रवाशांच्या जीवनाशी जोडलेली सेवा आहे. या सेवेला बळकटी देण्यासाठी आपल्या सर्व निवृत्त सहकाऱ्यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. आज आपण ज्या ठिकाणी आहोत, त्यामागे त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सेवेला सलाम करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संचालक प्रवीण जाधव म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचारी हे संस्थेची खरी संपत्ती असतात. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ पुढील पिढीला मिळणे आवश्यक आहे. एसटी को-ऑप बँकेच्या सभासदांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले.

एसटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक सुर्यकांत जगताप यांनी नोकरीतील निवृत्ती हा शेवट नसून जीवनातील एका नव्या पर्वाची सुरुवात असते. सेवाकाळात मिळवलेला अनुभव, शिस्त आणि कार्यनिष्ठा हीच निवृत्तीनंतरची सर्वात मोठी संपत्ती असते. निवृत्त कर्मचाऱ्यांनी सामाजिक कार्य, कुटुंब आणि आरोग्य यांना प्राधान्य देत आनंदी जीवन जगण्याचा त्यांनी सल्ला दिला.

कार्यक्रमात बोलताना संचालकांनी निवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्याने सोडविण्याची ग्वाही दिली. तसेच बँकेच्या माध्यमातून सभासदांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. यावेळी दोन्ही संचालकांनी एसबीआयच्या नियमांनुसार सभासदांसाठी विना जामीन कर्ज योजना तसेच विमा सुरक्षा योजना लवकरात लवकर लागू करण्याचे आश्वासन दिले.




उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात निवृत्त कर्मचाऱ्यांनी एसटी महामंडळाच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. निवृत्तीनंतरचे जीवन आनंदी, निरोगी आणि समाधानकारक जावे, अशा शुभेच्छाही यावेळी देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र टाक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शाखा व्यवस्थापक भालसिंग यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# किर्तनवाडी व भारजवाडीत एकाच रात्री सशस्त्र दरोडे

## ग्रामस्थांना मारहाण करत सुमारे २३ लाखांचा ऐवज लंपास | खरवंडी कासार परिसरात भीतीचे वातावरण

**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील खरवंडी कासार परिसरातील किर्तनवाडी व भारजवाडी येथे एकाच रात्री सशस्त्र चोरट्यांनी दरोडे टाकत रोख रक्कम व सोन्याचे दागिने लंपास केले. विरोध करणाऱ्यांना गंभीर मारहाण करण्यात आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवारी मध्यरात्री किर्तनवाडी येथील रावसाहेब बाजीराव कीर्तने यांच्या घरी सात जणांच्या टोळीने दरोडा टाकला. यामध्ये सुमारे अकरा तोळे सोन्याचे दागिने व तीन हजार रुपये रोख असा ऐवज लंपास करण्यात आला. चोरट्यांशी झालेल्या झटापटीत रावसाहेब कीर्तने गंभीर जखमी झाले असून त्यांच्या हाताच्या दंडावर, मानेवर तसेच तळहाताला गंभीर दुखापत झाली आहे.

याच वेळी शेजारी राहणारे बाबासाहेब दशरथ बटुळे यांच्या घरातून चार तोळे सोन्याचे दागिने व चाळीस हजार रुपये रोख असा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. या दरोड्यांमुळे खरवंडी परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.



घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुकम्मा सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्यासह अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी दुपारी किर्तनवाडी येथे भेट दिली. त्यांनी घटनेची माहिती घेत स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या.

रावसाहेब कीर्तने हे रात्री झोपलेले असताना सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास आवाज आल्याने जागे झाले. घराच्या कॅचीगेटचे कुलूप तोडून सहा चोरटे घरात घुसले होते, तर एक जण बाहेर थांबला होता. चोरट्यांनी कीर्तने यांना मारहाण करून चाकूचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन व अंगठी हिसकावून घेतली. यावेळी लोखंडी गजाने मारहाण करण्यात आली.

चाकूचा वार हाताने अडविताना त्यांच्या हाताच्या बोटाला व तळहाताला जखम झाली. तसेच हाताच्या दंडावर व मानेवरही मारहाणीमुळे दुखापत झाली. कीर्तने यांच्या पत्नी, मुलगा व सून यांच्याजवळील सोन्याचे दागिनेही चोरट्यांनी काढून घेतले.

दरम्यान, चोरटे एका बाजूला गेल्यानंतर कीर्तने यांच्या मुलाने चुलत्यांना फोन करून माहिती दिली. त्यानंतर गावातील नागरिक घटनास्थळी धावून आले. नागरिक जमा झाल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी तेथून पळ काढला.

त्यानंतर शेजारी राहणाऱ्या बाबासाहेब दशरथ बटुळे यांच्या घरात घुसून चार तोळे सोन्याचे दागिने व चाळीस हजार रुपये रोख असा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. तसेच भागवत बटुळे व शांताराम बटुळे यांच्या घरातही चोरीचा प्रयत्न करण्यात आला.

जखमी रावसाहेब कीर्तने यांच्यावर उपचार सुरू आहेत. खरवंडी परिसरात चोरी, गुंडगिरी आणि इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असून चोरटे व गुंड यांच्यावर पोलिसांचा धाक राहिलेला नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुकम्मा सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपासाची चक्रे वेगाने फिरविण्याच्या सूचना दिल्या. चोरट्यांना तातडीने अटक करावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस कटिबद्ध

■ जिल्हा पोलीस अधीक्षक मुकम्मा सुदर्शन म्हणाले, अहिल्यानगर येथे रुजू झाल्यानंतर प्रथमच पाथर्डी पोलीस ठाण्याला भेट देण्यासाठी आलो आहे. नवीन इमारतीचे उद्घाटन करावयाचे आहे. खरवंडी येथील घटनेची पाहणी केली असून कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम प्रभावीपणे केले जाईल. गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणा सक्रियपणे काम करेल. तिसगाव येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या निर्मितीबाबत विचारले असता, प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून त्याबाबतचा निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल, असे सुदर्शन यांनी सांगितले.

### खरवंडी भागातील अधिकाऱ्यांच्या बदलीची मागणी

■ खरवंडी भागासह तालुक्यात दरोडे, खून, मटका, जुगार, अवैध वाळू उपसा, मुलींची छेडछाड यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. पोलिसांवर गोळीबार करण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल गेली असल्याने खरवंडीसाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांची बदली करून त्यांच्या जागी नवीन अधिकारी व कर्मचारी नियुक्त करावेत, अशी मागणी किसन आव्हाड यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांकडे केली आहे.

# फडणवीस सरकारच्या कथित फसव्या कर्जमाफीविरोधात पारनेरमध्ये सर्वपक्षीयांची वज्रमूठ

**● पारनेर । वीरभूमी–**

फडणवीस सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीसंदर्भातील शासन आदेशात अत्यंत जाचक अटी व शर्ती घालण्यात आल्याचा आरोप करत, या निर्णयाविरोधात पारनेर तालुक्यातील विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी एकत्र येत तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

भूमिपुत्र शेतकरी संघटना, शिवबा संघटना, निलेश लंके प्रतिष्ठान, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन, उद्धव ठाकरे गटाची शिवसेना, संभाजी ब्रिगेड, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, युवा सेना, शेतकरी सेना, काँग्रेस, शरद पवार गट तसेच आमची माती आमची माणसं या संघटना व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक मंगळवारी (दि. १० जून) शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती.



या बैठकीत फडणवीस सरकारची कर्जमाफी योजना फसवी असल्याचा आरोप करण्यात आला. शासन आदेशातील अटींमुळे केवळ पाच टक्के शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळणार असून उर्वरित ९५ टक्के शेतकरी या योजनेपासून वंचित राहतील, असा दावा उपस्थितांनी केला.

या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयावर लवकरच भव्य निषेध मोर्चा काढून शासन निर्णयाची सर्वपक्षीय व विविध संघटनांच्या वतीने जाहीर होळी करण्यात येणार असल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. त्यानंतर खासदार निलेश लंके आणि आमदार काशिनाथ दाते यांना निवेदन देण्यात येणार आहे.

तसेच, शासनाच्या कर्जमाफी समितीतील प्रमुख अधिकाऱ्यांशी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे पाठपुरावा करण्याचेही या बैठकीत ठरविण्यात आले.

कर्जमाफीविरोधातील या भूमिकेमुळे पारनेर तालुक्यातील विविध पक्ष आणि संघटना एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळत असून, पुढील काळात मोठे जनआंदोलन उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत. या बैठकीत विविध पक्षांच्या नेत्यांनी आपापले राजकीय झेंडे बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र येत एकजुटीची वज्रमूठ दाखविल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# अहमदनगर पोस्टल सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात; सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहमदनगर पोस्टल सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन रामेश्वर ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर मध्ये उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात आमदार अक्षय कर्डीले यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार कर्डीले यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी अहिल्यानगरचे आय पी.ओ.एस अधीक्षक विकास पालवे यांनी पोस्टल विभागातील बदलत्या काळाची गरज आणि कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. सभेत संस्थेचे कार्यकारी संचालक प्रफुल्लकुमार काळे यांनी संस्थेच्या आर्थिक स्थितीचा आढावा सादर केला. कर्जवसुली नियमित होत असल्याने संस्थेची आर्थिक घडी मजबूत असून संस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेने यावर्षीही ऑडिट 'अ' वर्ग कायम ठेवला असून सभासदांना कायम ठेवींवर ११ टक्के व्याज व शेअर्सवर ७ टक्के लाभांश देण्यात आला आहे. यावेळी वरिष्ठ पोस्टमास्तर अमृत कुमटकर, ऑल इंडिया पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप–सीचे जनरल सेक्रेटरी सुरेंद्र पालव, मुंबई सोसायटीचे मानद सचिव महेश सावंत, सहाय्यक डाक अधीक्षक बाळासाहेब बनकर, अमित देशमुख, पोस्टल सोसायटीचे व्हाईस चेअरमन सुनील कुलकर्णी, निसार शेख, महेश तामटे, प्रमोद कदम, सलीम शेख, स्वप्ना चिलवर, अर्चना दहिंडे तसेच यावेळी संस्थेचे सभासद सतीश येवले, सचिन अस्वर, संदीप मिसाळ, सुखदेव पालवे, धनंजय दैठणकर, कविश्वर ताकपेरे, राजेंद्र राहिंज, सचिन गायकवाड, गणेश केसकर, अमोल बोरुडे, अंबादास सुद्रीक, बलराम दाते, सुनील चांडोले, कैलास भुजबळ, गोरक्ष आचार्य, जय मडावी, अर्जुन जटाळे, शंकर कडभणे, हर्ष कांबळे, आजीनाथ खेडकर, सुनील जाधव, सागर जाधव, शुभांगी मांडगे, ज्योती कांबळे, पदमराज पडलवार, संतोष झावरे, संचिता गाडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रफुल्लकुमार काळे यांनी केले. प्रमोद कदम यांनी आभार मानले.

# अगस्ती महाराजांनी दक्षिणेतील पहिला आश्रम अकोल्यात स्थापन केला

## स्वामी गुरु गोविंददेव गिरीजी महाराज | पुरुषोत्तम अधिक मासानिमित्त अकोले येथील अगस्ती आश्रमात महिनाभर अखंड कीर्तन महोत्सव

**● अकोले । वीरभूमी–**

अकोल्याची भूमी असामान्य असून दक्षिणेतील पहिला आश्रम अगस्ती महाराजांनी याच ठिकाणी स्थापन केला. या आश्रमात त्यांनी प्रभू श्रीरामांना शस्त्रागार दाखविले आणि रावणवधासाठी आवश्यक बाण प्रदान केले. राक्षसांच्या विनाशामध्ये या आश्रमाचे महत्त्व मोठे असल्याचे प्रतिपादन श्रीराम मंदिर ट्रस्ट, अयोध्या येथील कोषाध्यक्ष स्वामी गुरु गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले.

अकोले येथील अगस्ती आश्रमात पुरुषोत्तम अधिक मासानिमित्त महिनाभर अखंड कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार किरण लहामटे, अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ड. के. डी. धुमाळ, प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्तर नगर जिल्हा कार्यवाह दीपक जोंधळे आदी उपस्थित होते.

भारत हे धर्माधिष्ठित राष्ट्र असून सनातन धर्म हा देशाचा पाया आहे. सनातन धर्म समानतेचा संदेश देणारा असून त्यासाठी जीवन समर्पित करावे, असे आवाहन त्यांनी केले. दृढ इच्छाशक्तीमुळेच प्रभू श्रीरामांचे भव्य-दिव्य मंदिर उभारणे शक्य झाले, असेही त्यांनी नमूद केले. अगस्ती महाराजांच्या दहा पुत्रांचा राक्षसांनी वध केल्यामुळे त्यांच्या विनाशासाठी त्यांनी नियोजन केले आणि विविध ठिकाणी आश्रम स्थापन केले. अकोले येथे अगस्ती महाराज लोपमुद्रा मातेसह वास्तव्यास होते. त्यामुळे ही भूमी पवित्र मानली जाते. आदित्य स्तोत्राची निर्मिती त्यांनी केली असून त्याचा महिमा आजही कायम असल्याचे त्यांनी सांगितले.

अमृतवाहिनी प्रवरा माता अत्यंत पवित्र असून तिच्या तीरावर अकोले येथे अगस्ती आश्रम आणि नेवासा येथे ज्ञानेश्वरीचे लेखन झाले. गोदावरी स्नान आणि प्रवरा पान म्हणजे प्रवरा नदीचे पाणी पिणे, कारण ते शुद्ध व औषधी गुणधर्म असलेले असल्याची माहितीही त्यांनी दिली. प्रवरेच्या तीरावरील सर्वजण आपण बंधुभावाने जोडले गेलो आहोत, असेही ते म्हणाले.

अकोले मतदारसंघाचे आमदार किरण लहामटे म्हणाले की, मानसिक समाधान मिळावे यासाठी ते आठवड्यातून दोन ते तीन वेळा अगस्ती महाराजांच्या दर्शनासाठी येतात. अगस्ती देवस्थानच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ यांनी प्रभू श्रीराम कॉरिडॉरमध्ये अगस्ती देवस्थानचा समावेश करून देवस्थानाच्या विकासासाठी स्वामी गुरु गोविंददेव गिरीजी महाराज यांनी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात अगस्ती महाराजांची मूर्ती स्थापित करण्यात आली असून तिची प्रतिकृती अकोले येथील आश्रमातील मूर्तीप्रमाणेच तयार करण्यात आल्याचे सांगताना हा अगस्ती आश्रमाचा गौरव असल्याचे मत दीपक महाराज देशमुख यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रवरा पुलावर प्रवरा मातेचे पूजन करण्यात आले. तसेच अगस्ती



महाराज गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी संकेत महाराज आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली टाळ-मृदुंगाच्या गजरात मिरवणूक काढली.